# स्वामी मुक्तानंद यांची दिव्य दीक्षा

*'चित्‌शक्ती विलास,' या त्यांच्या आध्यात्मिक आत्मकथेतील प्रकरण दहामध्ये, बाबा मुक्तानंद त्या प्रातःसमयाचे वर्णन करतात, जेव्हा त्यांचे श्रीगुरू, भगवान नित्यानंद यांनी त्यांना दिव्य शक्तिपात दीक्षा प्रदान केली होती. बाबा त्या प्रातःसमयी घडलेल्या घटनेचे गुणगान करतात आणि वर्णन करताना सांगतात की, ही ती निर्णायक घटना होती जिने त्यांच्या साधनेला गतिशील केले आणि ज्यायोगे त्यांच्या संपूर्ण जीवनाच्या शोधाची परिपूर्ती झाली; तो शोध होता, परम आत्म्याशी एकाकार होणे.*

***

*चित्‌शक्ती विलास,* प्रकरण १०

१५ ऑगस्ट, १९४७—किती शुभ दिवस होता तो! किती अमृतमय होता! किती दिव्य! केवढे पुण्य आणि केवढे महाभाग्य घेऊन आला होता! माझ्या जीवनातला सुदिन! आयुष्यातला मंगलमय दिवस! फार काळामधील, अनेक जन्मांतील तोच एक महान दिवस होता. तो परम पुनीत, हो, तो 'मंगलानां च मंगलम्' दिवस उदयाला आला.

सूर्य उगवून किंचितसा वर आला होता. वातावरण शांत होते. पूर्वेकडील कोपऱ्यात मी उभा होतो. आत ध्यानाच्या खोलीत श्रीगुरुदेव आपल्या स्वस्वरूप ध्यानातून उठण्याचा पूर्वतयारीसूचक हुंकार देत होते. थोड्याच वेळात गुरुदेव बाहेर आले. आज काहीतरी नवीनच रूप होते. पूर्वी कधीही असे रूप पाहिले नव्हते.

मी पाहिले, की ते एक सुंदर पादुकांची जोडी पायात घालत आहेत. ते पुढे-मागे जात, स्मितहास्य करीत. एकदा त्या कोपऱ्यात जात आणि काही गुह्य मंत्र गात. माझ्यासमोर येऊन पुन्हा स्मितहास्य करीत. गाणे गात. त्यांनी एक सफेद शाल पांघरली होती. कमरेला फक्त लंगोटी आणि पायात पादुका

होत्या. ते पुन्हापुन्हा माझ्यासमोर उभे राहून जोरात ‘हूं’ असा शब्द उच्चारीत होते. असाच एक तास निघून गेला.

त्यानंतर गुरुदेव माझ्याजवळ आले. त्यांनी माझ्या अंगाला आपले अंग भिडविले. या नव्या आश्चर्याने माझे शरीर स्तब्ध झाले. समोर पश्चिमेकडे तोंड करून मी उभा होतो. गुरुदेव माझ्या शरीराला खेटून पूर्वाभिमुख उभे होते. मी डोळे उघडून पाहू लागलो. पाहिले, की गुरुदेवांचे शांभवी मुद्रेत पूर्णपणे उघडे असलेले नेत्र माझ्या नेत्रांत एकाकार झाले होते. माझे शरीर शून्य होऊन गेले. डोळे बंद करू शकत नव्हतो, कारण ते उघडण्याची किंवा मिटण्याची स्वतंत्र शक्ती माझ्यात नव्हती. गुरुदेवांच्या डोळ्यांतील दिव्य तेजाने माझे डोळे पूर्ण स्थिर झाले. ही स्थिती थोडा वेळ राहिली.

मग ‘हूं’ रूपात गुरुदेवांचा दिव्य नाद ऐकला. गुरुदेव दोन फूट मागे सरकले होते. मी थोडा भानावर आलो. “हे घे, तू या खडावा घाल,” असे म्हणून त्यांनी विचारले, “माझ्या या खडावा घालशील?” मी आश्चर्याने, आदराने आणि धीर एकवटून म्हणालो, “गुरुदेव! या खडावा माझ्या पायात घालण्यासाठी नाहीत. बाबा जी! माझ्यासाठी तर ह्या आयुष्यभर पूजनीय आहेत. जर आपण कृपा केलीत, तर मी पदर पसरतो; आपण त्या आपल्या पायांनीच त्यात ठेवाव्यात.”

पूज्य गुरुदेवांनी ही गोष्ट मान्य केली. ‘हूं’ ‘हूं’ असा ध्वनी करत प्रथम आपला डावा पाय खडावेसहित वर उचलून माझ्या पसरलेल्या झोळीत ती खडाव ठेवली. नंतर पहिला पाय खाली ठेवून, दुसरा म्हणजे उजवा पाय उचलून दुसरी खडाव ठेवली. ते सरळ माझ्यासमोर उभे राहिले. माझ्या डोळ्यांमध्ये पुन्हा एकदा दृष्टिपात केला. मी मोठ्या सावधपणे पाहिले. त्यांच्या डोळ्यांच्या मध्यबिंदूमधून ज्योतिकिरण माझ्या आतमध्ये प्रवेश करीत होता. तो किरण उष्ण तेजयुक्त दाहक तापासारखा मला स्पर्श करीत होता. त्याचा प्रकाश एखाद्या मोठ्या ‘बल्ब’च्या प्रकाशाप्रमाणे डोळे दिपवून टाकणारा होता. जेव्हा भगवान नित्यानंदांच्या नेत्रांच्या मध्यबिंदूतून ज्योतिकिरण बाहेर प्रसारित होऊन माझ्या डोळ्यांत प्रवेश करीत होता, तेव्हा मी आश्चर्य, विस्मय, आनंद आणि भयाने रोमांचित होऊन गेलो.

त्या किरणाचा रंग पाहत असताना, भगवानांनी दिलेला मंत्र ‘गुरू ॐ’चा मी जप करीत होतो. किरण अखंड होता. त्यात दिव्य चमक होती. त्याचा रंग कधी अग्नीने तप्त झालेल्या सुवर्णाच्या कांतीसारखा होता, तर कधी केशरासारखा, तर कधी चमचमणाऱ्या नक्षत्रापेक्षाही जास्त तेजयुक्त गर्द निळ्या रंगाचा होता. ती तेजोमय किरणे माझ्यामध्ये प्रवेश करीत असलेली पाहून मी स्तब्ध, स्थिर होऊन गेलो. शरीर पूर्ण जड झाले. त्यानंतर श्रीगुरुदेव थोडेसे हलले आणि त्यांनी पुन्हा हुंकाराचा घोष केला. तेव्हा माझी

जडता थोडी कमी झाली आणि मी भानावर आलो. मी झोळीत लपेटलेल्या त्या पादुकांवर मस्तक नमविले. त्यानंतर साष्टांग दंडवत घालून प्रणाम केला. प्रणाम करून परमानंदाने उल्हसित होऊन उठलो.

गुरुदेव हॉलच्या पश्चिमेकडे गेले. थोडी फुले घेऊन आले, त्याचबरोबर दोन केळी, दोनतीन अगरबत्त्या आणि कुंकवाची एक पुडीदेखील आणली. त्यांनी ते सर्व पादुकांवर ठेवले. मी 'ॐ ॐ गुरू ॐ' जपू लागलो.

श्रीगुरुदेव बोलू लागले, "सारे मंत्र एक. सारे ॐ. 'ॐ नमः शिवाय ॐ' 'शिवोऽहम्' झाले पाहिजे. 'शिव, शिव'-'शिवोऽहम्' झाले पाहिजे. अंतरंगात झाले पाहिजे. बहिरंगापेक्षाही अंतरंग श्रेष्ठ रे!" बाबा जी 'हूं' म्हणून त्यांच्या खोलीत गेले.

भगवान आतमधून बाहेर आले. त्यांच्या हातात एक निळ्या रंगाची शाल होती. ती त्यांनी माझ्या अंगावर घातली. त्यानंतर भगवान मोठ्या वेगाने स्वयंपाकघराच्या दिशेने गेले, जिथे कच्च्या केळ्यांची भजी तयार होत होती. भगवानांनी दोन्ही हातांची ओंजळ भरून त्यातली भजी उचलली आणि त्याच झोळीत टाकली ज्यात गुरुपादुका होत्या. शेवटी त्यांनी आपल्या आनंदमय मुखमुद्रेने 'हूं' म्हणून जाण्याचा इशारा केला.

बाहेर येऊन मी त्या पादुका वारंवार मस्तकास लावू लागलो. भजी एक-एक करून खाऊ लागलो. फुलांचा वास घेत राहिलो. शालीचा मऊमुलायमपणा, तिची सुंदरता, महानता पाहतापाहता हर्षभरित होत होतो. मी माझ्या भाग्याला धन्यवाद देतदेत, परशिवाच्या अहोकृपेची प्रशंसा करीतकरीत, हळूहळू माझ्या निवासस्थानाकडे जाऊ लागलो. जाताजाता गुरुभाव आणि गुरुभक्ती पुन्हा उदित होऊ लागली. भावनेच्या आवेगाने गुरुभाव वाढू लागला.

डोक्यावर श्रीगुरुदेवांच्या पादुका होत्या. रस्त्यात गांधीपाड्याच्या पुढे गेल्यावर, जिथे एक छोटासा पूल म्हणजे नाली येते, जिथून सध्याच्या 'श्री गुरुदेव आश्रमा'ची सीमा सुरू होते, जिथे त्या छोट्याशा पुलाला लागूनच एक औदुंबराचा वृक्ष आहे, तिथे पोहोचताच दिव्य गुरुभाव ब्रह्मभावात बदलून गेला. आंतरिक-बाह्य जगात, भिन्नभिन्न भेद करून 'एकात अनेक' दाखविणाऱ्या भेदवृत्तीला सोडून, क्षणभरात 'अनेकात एक' या भावाची अनुभूती झाली. 'गुरू ॐ, गुरू ॐ' जपताजपता, 'आत गुरू, बाहेर गुरू' असे म्हणताम्हणता, वेदान्ताचा ब्रह्मसिद्धान्त जो मी पूर्वी निरनिराळ्या आचार्यांकडून शिकलो होतो, तो पुन्हा स्फुरू लागला.

किंचित वरुणदेवाचीही कृपा झाली. झिमझिम पावसाच्या सरीचा हलकासा शिडकावा झाला. शीतल वारा हळुवारपणे वाहू लागला. मी माझे डोळे मिटत होतो आणि पुन्हा उघडत होतो. आतून अनंत ज्योतींचा एक किरणपुंज झगमग-झगमग करू लागला आणि प्रकाशाच्या कोट्यवधी छोट्याछोट्या लखलखणाऱ्या ठिणग्या माझ्या बंद डोळ्यांना दिसू लागल्या. मी पाहतच राहिलो! काय सुंदर दृश्य होते! अतिसूक्ष्म ठिणग्या लुकलुक-लुकलुक करीत चमचमत होत्या. त्या माझ्या आत सर्वांगामध्ये दिसत होत्या. त्यांची गती विस्मयजनक होती. त्यांचा असा वेग आणि संख्या पाहतापाहता मी आनंद व आश्चर्याने भरून गेलो.

डोळे उघडून बाहेर बघू लागलो. बाहेरही त्याच अनंत स्फुलिंगयुक्त चमचम करणाऱ्या चमकदार, अणूंपेक्षाही लहान, निळ्या ठिणग्यांच्या लखलखणाऱ्या असंख्य पंक्ती दृष्टीस पडल्या. त्या पाहतापाहता खूप हर्षभरित, भावयुक्त आणि आश्चर्यान्वित होऊन गेलो. एक नवीन अनोखे दृश्य चित्रपटात नव्हे, तर माझ्या चारही बाजूंना प्रत्यक्षात पाहत होतो. मी अगदी धिम्या गतीने चालत होतो. मला कळतच नव्हते, की मी रस्त्यावरून चालतो आहे, का रस्ता माझ्या मागेमागे येतो आहे. गावदेवी मंदिराजवळ आल्यावर मी थांबलो. गणेशपुरीच्या दिशेला माझे मुख आपोआपच वळले. आठवण आली प्रिय गुरुदेवांची. त्यांना पुन्हा मनोमन नमस्कार केला. रस्त्याच्या कडेकडेने पुढे जाऊ लागलो.

वरुणदेवाच्या कृपारूप छोट्याछोट्या थेंबांचा अजूनही वर्षाव होत होता. तो रिमझिम पावसाचा कोमल शिडकावा, चमचम करणाऱ्या निळ्या रंगाच्या लहानलहान किरणांशी मिसळून अद्भुत वाटत होता. मी हृदयामध्ये सर्वात्मभावरूप श्रीगुरुस्मरण करीतकरीत, श्रीगुरुचरणपादुका मस्तकावर ठेवून हळूहळू चालत होतो. आजही मला त्या एकाकार अनुभूतीची पूर्ण स्मृती आहे. ते छोटेछोटे नीलबिंदू मला अजूनही दिसत आहेत.

चालतचालत वज्रेश्वरी मंदिरापाशी जाऊन पोहोचलो. मंदिराच्या मागच्या बाजूला एक छोटेसे दत्ताचे मंदिर आहे. मी नेहमी तिथे राहत असे. त्या दत्त मंदिरात मी गुरुपादुकांची पूजा आणि थोडे ध्यान करू लागलो.

किती महिमापूर्ण गोष्ट होती!

किती महान सुमंगल दिन, पुण्यकाळ होता तो!
माझा ताप मिटला, पाप कटले, जन्म-मरण घटले. अविद्येचा पडदा दूर झाला.

अशा प्रकारे त्यांनी मला दिव्य दीक्षा दिली.

---

स्वामी मुक्तानंद यांच्याद्वारे लिखित, *चित्शक्ती विलास : एक आध्यात्मिक आत्मकथा,* प्रकरण १० 'दिव्य दीक्षा'मधून उद्धृत व रूपांतरित अंश [चित्शक्ती पब्लिकेशन्स, २०१३], पृ ६७-७५.

डिझाइन प्रारूप रचना : मेझी मॅक्क्रॅडी

© २०००, २०२२ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

कृपया कॉपी, पोस्ट अथवा वितरित करू नये.